जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०१/०९/२०२३
## दि.३१/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ६९८/२०२३,भादविक ३०२,२०१,३५४,३४१,३४२,३२४,३२३,५०४,५०६(२) बालकांचे लैगिंक अपराधापासुन सरंक्षण अधिनियम २०१२ चे कलम ७,३(क),४ |
| **फिर्यादी** | एक अल्पवयीन मुलगी,वय-१७ वर्षे,रा.आव्हाळवाडी,पुणे |
| **आरोपीत** | संदीप मोरे,वय ४१ वर्षे,रा.आव्हाळवाडी,ता.हवेली,जि.,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०८/२०२३ रोजी रात्रौ २२/०० वा.पासुन ते दिनांक ३१/०८/२०२३ चे कालावधीत पहाटे ०४/०० वा.माहेर संस्थेजवळ,माळवाडी,आव्हाळवाडी,पुणे याठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे आई व नमुद इसम यांचेमध्ये झालेल्या वादाचा राग मनात धरुन,त्याने दारु पिवुन येवुन,फिर्यादी व त्यांचे भाऊ किचन मध्ये झोपले असताना किचन मध्ये येवुन फिर्यादी यांचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी फिर्यादी यांचे आईने अटकाव केल्यामुळे फिर्यादी यांची आई दिपाली संदीप मोरे,वय-३६ हिस लाकडी बांबुने तीचे डोक्यावर,पायावर व हातावर मारहाण करुन,तीचे डोके भिंतीवर आपटुन तीला खाली पाडुन,तीचा पायाने गळा दाबला. तसेच फिर्यादी व त्यांचे दोन्ही भाऊ यांना शिवीगाळ व मारहाण करुन डांबुन ठेवले. तसेच सदर इसमाने दुचाकी हिचेमधुन पेट्रोल काढुन,सदरचे पेट्रोल आईचे अंगावर टाकुन तुला जाळुन मारतो अशी धमकी देवुन तीस जबर मारहाण करुन तीचा खुन केला. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्रीमती.सीमा ढाकणे ८८८८८३०७१४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १९५/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-६९,रा.९६४,नाना पेठ,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०८/२०२३ रोजी २०/१५ वा. फिशर क्लबच्या समोर,पदमजी पार्क,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मार्केट मध्ये पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे जवळील ३५,०००/- रुपये रोख रक्कम व मोबाईल असा एकुण ४०,०००/- रू किचा ऐवज जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, संजय माळी ७०२१२६४१७५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ४१७/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २२ वर्षे,रा.चंदननगर,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०८/२०२३ रोजी रात्रौ ०८/०० वा.मणिपाल हॉस्पीटल,खराडी बायपास रोड,खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे चुलत भाऊ याचेसह कामाचे ठिकाणी जात असताना,नमुद ठिकाणी मणिपाल हॉस्पीटलचे समोरील रोडवर गाडीवरुन घसरुन पडले असता,सदर ठिकाणी मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम यांनी प्रथम फिर्यादी यांना मदत करण्याचा बहाणा करुन चुलत भाऊ यास धक्का-बुक्की व दमदाटी करुन,फिर्यादी यांचे पॅन्टचे खिशातील मोबाईल मोबाईल फोन व १,०००/- रुपये रोख रक्कम असा एकुण ११,०००/- रु किचा ऐवज जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अरविंद कुमरे ९५५२५३८३७१ |

## <u>दि.०१/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्ह</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ८८८/२०२३,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | शाम ठोंबरे,वय ३८ वर्षे,रा.घुंगर्डे,हादगाव,ता.आंबड,जि.जालना |
| **आरोपीत** | १.मयताचे पती व इतर दोन (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०१/२०१७ रोजी ते दि.३१/०८/२०२३ रोजी १३/०५ वा.चे दरम्यान लेन नं.०४,गोकुळ नगर,कात्रज-कोंढवा रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे भाऊ बाबासाहेब रामभाऊ ठोंबरे यांची मुलगी सौ.निशा संतोष भारस्कर, वय २५ वर्षे,रा.गोकुळ नगर,कात्रज कोंढवा रोड,पुणे हिचे लग्न तीचा पती आ.क्र.१ याचे बरोबर दि.१३/०१/२०१७ रोजी होवुन,ती सासरी नांदत असताना,आ.क्र.१ याने वारंवार दारु पिवुन येुवन,तीस हाताने मारहाण व शिवीगाळ करुन,इतर नातेवाईक यांनी वारंवार भांडणे काढुन,तीस माहेरहुन २५,०००/- रुपये घेवुन येण्यासाठी तगादा लावुन,तीस शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास देवुन,पैसे आणले नाहीतर राहते घरातुन बाहेर काढु अशी धमकी देवुन,सौ.निशा हिस आत्महत्या करण्यास चिथावणी देऊन प्रवृत्त केल्याने,तीने दि. ३१/०८/२०२३ रोजी तीचे गोकुळनगर येथील राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. विकास बाबर ९९६७९११०३३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**